**<u>सं. फौ. ख. क्र.४८९/२०२२</u>**
**<u>अनंत नागरी सह. पत. वि. शामराव पवार</u>**
**<u>निशाणी क्र.१४ च्या पुढे.</u>**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ सुधीर भोसले यांचा पुढील सरतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री.एच. डी. नरुटे, यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

६. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१४ वर दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. मला अनंत नागरी सहकारी पतसंस्था यांचेतर्फे ठराव क्र.७ दि.१९/०४/२०२१ नुसार प्रकरण चालविण्याचे अधिकार दिलेले आहेत. आता मला सदर प्रत दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>नि.क्र.१९</u>** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.१८/१ वरील चेक दाखविण्यात आला. तो आरोपीने फिर्यादीस दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.२०</u>** देण्यात येतो. नि.क्र.१८/२ वर फिर्यादीस बँकेने पाठविलेले पत्र दाखविण्यात आले. त्यास **<u>नि.क्र.२१</u>** देण्यात येते. नि.क्र.१८/३ वर मी चेक परत आल्याचा मेमो दाखल केलेला आहे. सदर मेमोस **<u>नि.क्र.२२</u>** देण्यात येते. नि.क्र.१८/४ आरोपी यांनी पतसंस्थेकडे कर्ज मागणी अर्ज दिला होता. आता मला सदर अर्ज दाखविला. तो तोच आहे. त्यास **<u>नि.क्र.२३</u>** देण्यात येते. आरोपीने कर्जरोखा लिहून दिला. त्यास **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते. तसेच आरोपीने वचनचिठ्ठी लिहून दिली. त्यास **<u>नि.क्र.२५</u>** देण्यात येते. संस्थेमध्ये व आरोपीमध्ये करारनामा झाला. आता मला सदर करारनामा दाखविला. तो तोच आहे. त्यास **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येते. आरोपीच्या खात्याची खतावणी मी दाखल केलेली आहे. त्यास **<u>नि.क्र.२७</u>** देण्यात येते. आता मला फिर्यादी संस्थेने आरोपीला दि.३०/०६/२०२२ रोजी नोटीस पाठविली. आता मला सदर नोटीस दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>नि.क्र.२८</u>** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीला पाठविल्याची पावती दाखल केली आहे. त्यास **<u>नि.क्र.२९</u>** देण्यात येते. आरोपीस सदर नोटीस पोहोचल्याचा पोस्टाचा अहवाल दाखल केलेला आहे. त्यास **<u>नि.क्र.३०</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. आर. आर. बनसोडे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो........**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.३१/०७/२०२५**

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.